डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान

# डी. वाय. पाटील विद्यानिकेतन स्कूल
# साळोखेनगर, कोल्हापूर.

# मराठी क्लब

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जहालो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी

प्रस्तावना :

मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. या भाषेवर आपण खूप प्रेम करतो. याच कारणात्सव मराठी क्लब स्थापन करण्याचा उद्देश हा आहे की, सर्वांना मातृभाषेचे ज्ञान व्हावे व आवड निर्माण व्हावी. क्लबच्या माध्यमातून खालील उद्देश साध्य होतील.

१. मुलांना वाचनाची सवय लागेल.
२. मराठी साहित्याची गोडी निर्माण होईल.
३. मराठी भाषेचे ज्ञान वाढेल.
४. मराठी लिखानाची आवड निर्माण होईल.
५. पौराणिक कथा, साहित्य वाचनाची सवय लागेल.
६. मराठी भाषेमुळे संस्कार चांगले होतील.
७. भाषेचे महत्व व सातत्य टिकून राहील.
८. भाषेवर प्रभुत्व मिळवेल.
९. कविता करणे, काव्यरचना करणे.

या सर्व गोष्टी साध्य करण्यासाठी आम्ही हा क्लब स्थापन केला आहे, तरी इच्छुक व आवड असणाऱ्या मुलांनी सभासद नोंदणी करावी.

विषय अध्यापक

महिना- जून

# वाचन कौशल्य

मराठी वाचनात प्रगत व अप्रगत असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करून या विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याच्या विकासासाठी जून महिन्यामध्ये मार्गदर्शन करण्यात आले.

प्रगत मुले-

या मुलांचे भाषेचे ज्ञान अधिक वाढविण्याकरीता मुलांना भाषेचे महत्व, भाषेतील साहित्याचे प्रकार, भाषेची निर्मिती अशा अनेक भाषेच्या संकल्पना सांगून भाषेचे ज्ञान समृध्द करण्याचा प्रयत्न केला.

मुलांच्या आवडीनुसार काव्य वाचन, कथा वाचन, लेख वाचन घेवून त्यांच्या भाषाज्ञानामध्ये विकास साधण्याचा प्रयत्न केला.

अप्रगत मुले-

या मुलांच्या मराठी भाषा वाचनातील समस्या जाणून घेवून प्रती विद्यार्थ्याची स्थितीनुसार त्याला मार्गदर्शन केले. सर्व प्रथम मुळाक्षरांची ओळख व वाचन, त्यानंतर स्वर, व्यंजन व बाराखडी या घटकांचे मार्गदर्शन करून त्यांच्या ज्ञानामध्ये भर घालण्यात आली.

विषय अध्यापक

महिना- जुलै

# लेखन कौशल्य

मराठी लेखनाच्या समस्या जाणून घेण्याकरीता निबंध स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेच्या माध्यमातून मुलांची वर्गानुसार, गटानुसार विभागणी करून त्यांच्या बुध्दीस्तरानुसार विषय देवून मर्यादित ओळींचा निबंध लिहून घेवून त्यांच्या लेखनातील समस्या जाणून घेतल्या.

समस्यांचे निराकरण करण्यासाठी योग्य पध्दतीचा अवलंब करण्याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या चूका दुरूस्त झाल्याचा प्रत्यय पुढील लेखनात जाणवला.

विषय अध्यापक

महिना- ऑगष्ट

# नाटय सादरीकरण

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र याचबरोबर साहित्यातील एक आगळावेगळा आविषकार म्हणजे नाटक होय. प्राचीन कालावधीपासून समाजप्रबोधनाचे एकमेव साधन म्हणून नाटक या घटकाकडे पाहीले जाते. पु. ल. देशपांडे, प्र. के. अत्रे, रामगणेश गडकरी यासारख्या नाटक साहित्यकारांनी मराठी नाटयक्षेत्रात बहुमुल्य योगदान केले आहे. या साहित्यीकांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, नाटक ही संकल्पना त्यांना कळावी, या उद्‌देशाने नाटयसादरीकरण घेण्यात आले.

वर्गातील इच्छिुक व आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना त्यांच्या भूमिकेचे मार्गदर्शन केले. सर्वधर्म समभाव जोपासणारी नाटीका विद्यार्थ्यांच्याकडून सादर करून घेतली. सर्व विद्यार्थ्यांनी आपआपली भूमिका यशस्वीरित्या पूर्ण करून नाटयसादरीकरण केले.

विषय अध्यापक